**अत्यंत महत्वाचे / हस्ते बटवडा**

# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.क./ २७५ /२०११

**परिपत्रक :-**

विद्यापीठातील विविध विभागाचे संचालक /विभागप्रमुख तसेच प्राचार्य, सर्व संलग्नित अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र व एम. सी. ए महाविद्यालये तसेच, संचालक, व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्था यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

दिनांक :- ०९ सप्टेंबर, २०११
स्थळ :- मुंबई - ४०००३२.

[ (प्राचार्य, (डॉ.) एम. एस. कु-हाडे) ]
प्रभारी कुलसचिव

-----------------------x-----------------------x-----------------------x-----------------------

## महाराष्ट्र शासन
## संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य,मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

Web www.dirhe.org.in
E-mail dirhe@pn2.vant.net.in

फोन नं.०२०/२६१२६९३९
फॅक्स नं. ०२० /२६१११५५३

क्र.उशिसं/पीएमएस ऑन -लाईन/२०१०-११ -/१४अई/८४९
दिनांक :- १२/०८/२०११

कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ,
मुंबई.

विषय :- <u>१०० टक्के केंद्र शासन पुरस्कृत पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना सन २०१०-११ पासून ऑन लाईन करण्याबाबत.</u>

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक पोमॅस्कॉ-२०१०/(२९४/१०)/मशि-३ दिनांक २० मे, २०१०.

उपरोक्त विषयी, मुस्लिम, ख्रिश्चन, बौध्द व पारशी या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना पोस्ट मॅट्रीक शिक्षणासांठी १०० टक्के केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना राज्यामध्ये सन २००८ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा व त्यासाठी आवश्यक असलेला अर्ज सोयीस्करपणे उपलब्ध व्हावा व तो विद्यार्थ्यांना केव्हाही सहजपणे भरता यावा म्हणून ही योजना ऑन लाईन पध्दतीने सन २०११-१२ पासून राबविण्यात येत आहे.

सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी राज्य शासनाने संदर्भीय शासन निर्णयानुसार, संबधीत विद्यालये / महाविद्यालये / खाजगी-शासकीय शैक्षणिक संस्था / अकृषी विद्यापीठे यांचे विभागप्रमुख यांच्यावर, विभागीय शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्यावर, शिक्षण संचालक, मरा, पुणे-१ यांच्यावर जबाबदारी टाकलेली आहे. **सदरची ऑन-लाईन प्रक्रिया ही चालू शैक्षणिक वर्ष सन२०११-१२ पासून राबविवण्यांत येणार असल्याने आपणांस खालीलप्रमाणे महत्वाच्या सूचना करण्यात येत आहे.** ***<u>सदर्भीय शासन निर्णयासोबतच्या तक्त्यामधील कार्यक्रम पत्रिकेतील कालावधीचे कटाक्षाने पालन करण्यांत यावे.</u>***

१) अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना ऑन-लाईन अर्ज भरल्यानंतर सदर अर्जाची मूळ प्रत (हार्ड कॉपी) संबधीत कागदपत्रांसह त्या-त्या विद्यालये/ महाविद्यालये / खाजगी-शासकीय शैक्षणिक संस्था / अकृषी विद्यापीठे याना सादर केल्यानंतर, सदरहू विद्यालये/ महाविद्यालये / खाजगी-शासकीय शैक्षणिक संस्था / अकृषी विद्यापीठे यांनी प्रमाणित केलेल्या पात्र अर्जांची मूळ प्रत ( हार्ड कॉपी) संबधीत कागदपत्रांसह व सॉफ्ट कॉपी ते संबधीत विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण कार्यालयांना संबधित देतील. संबधीत अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांची सदरहू प्राप्त अर्जांची हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपी जमा करुन घेण्यात यावी .

२) अशा प्रकारचे अर्ज प्राप्त करुन घेण्यासाठी, त्या त्या विद्यालये महाविद्यालये / खाजगी-शासकीय शैक्षणिक संस्था / अकृषी विद्यापीठे यांचेशी वेळोवेळी संपर्क साधणे. त्यासाठी आपल्या अधिकारक्षेत्रात येणा-या विद्यालये/ महाविद्यालये / खाजगी-शासकीय शैक्षणिक संस्था / अकृषी विद्यापीठे यांच्या प्रमुखांच्या बैठका आयोजित करणे, सदर बैठकांमध्ये संबधीतांना विषयांशी संबधीत आवश्यक ते मार्गदर्शन करणे. आवश्यकता पडल्यास स्थानिक वृत्तपत्रांमध्ये सदर योजनेबाबत बातमी देवुन जास्तीत जास्त अल्पसंख्यांक समाजापर्यंत सदरहू अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना चालू वर्षापासून ऑन लाईन पध्दतीने राबविण्यात येत असल्याबाबत जागरुकता येईल असे बघणे.

३) विद्यालये/महाविद्यालये / खाजगी-शासकीय शैक्षणिक संस्था / अकृषी विद्यापीठे यांच्याकडून प्राप्त झालेल्या संबधीत अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांच्या सदर अर्जांची, ऑन लाईन यंत्रणेवरुन तसेच, संबधीत कागदपत्रांसह मूळ प्रत ( हार्ड कॉपी च्या स्वरुपात) प्राप्त करुन घेण्यात यावी व असे सदरहू अर्ज विहीत शर्ती व अटींची पूर्तता करीत असल्याबाबतची पडताळणी करुन प्रमाणीत करावी.

४) पात्र विद्यार्थ्यांची यादी व अपात्र विद्यार्थ्यांची यादी वेगळी करुन पात्र विद्यार्थ्यांची यादी ऑन लाईन पध्दतीने शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचेकडे पाठविण्यात यावी. तसेच पात्र अथवा अपात्र विद्यार्थ्यांना त्यांचा अर्ज स्वीकृत करण्यात आलेला आहे अथवा नाकारण्यात आलेला आहे, याबाबत अवगत करण्यात यावे.

५) सदरहू योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी शासनाने नियुक्त केलेले सेवापुरवठादार मे. मॅस्टेक कंपनी यांचेकडून ऑन लाईन पध्दतीचे प्रशिक्षण दिले जाईल. त्यासाठी आपण आपल्या स्टाफमधून किमान दोन-तीन कर्मचारी व एका अधिका-याची निवड करावी व त्यासाठी आवश्यक त्या सुविधा, अन्य मनुष्यबळ तसेच, तत्संबधींच्या अनुषंगिक बाबी वेळोवेळी पुरविण्यांत याव्यात.

६) विद्यालये/ महाविद्यालये / खाजगी-शासकीय शैक्षणिक संस्था / अकृषी विद्यापीठे हे आपणाकडे संबधित अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या अर्जांची हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपी पाठविणार असल्याने, आपणांस प्राप्त झालेले असे सर्व अर्ज व त्याच्याशी संबधीत कागदपत्रे सुरक्षितपणे जतन करावे.

७) आपल्या अखत्यारित येणा-या विद्यालये/ महाविद्यालये / खाजगी-शासकीय शैक्षणिक संस्था / अकृषी विद्यापीठे येथे शिकत असलेल्या अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती या योजनेस प्रस्तावीत असलेल्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या तक्रारीचे निराकरण करण्यासाठी आपल्या स्तरावरुन एक समिती स्थापित करण्यात यावी व वेळोवेळी प्राप्त होणा-या तक्रारीचे निराकरण समाधानपूर्वकरित्य करण्यांत यावे.

८) ज्या वेळेस मे. मॅस्टेक कंपनीचे प्रतिनीधी आपल्या विभागात सदर योजनेच्या ऑन लाईन प्रक्रियेचे प्रशिक्षण देण्यासाठी येतील, त्या वेळेस आपल्या विभागांतर्गत येणा-या विद्यालये/ महाविद्यालये ./ खाजगी-शासकीय शैक्षणिक संस्था / अकृषी विद्यापीठे यांच्या प्रमुखांची संबधीतांची कार्यशाळा घेवून, त्यांना सदर प्रक्रियेबाबत अवगत करुन देण्यात यावे.

९) सदरहू योजनेच्या ऑन लाईन प्रक्रिया राबविताना विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयांना कार्यालयीन कामकाज वेळेत करता यावे यासाठी, कमीत कमी आठ तांसाच्या back-up मिळावा या उददे्शाने तसेच, सद योजना विना-अडथळा सुव्यवस्थितपणे राबविण्यांत याव्यात यासाठी, शासनाकडून आपणांस एक यु.पी.एस व सोबत एकुण १२

....३